दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग परीक्षा

१. संवर्ग व पदे याबाबतचा संक्षिप्त तपशील:-

१.१ राज्य शासनाच्या न्यायिक सेवेतील दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग संवर्गातील पदे शासनाच्या मागणीनुसार तसेच पदांच्या उपलब्धतेनुसार सदर परीक्षेमधून भरण्यात येतात.

१.२ पदांचा तपशील:-

(१) संवर्ग:- राज्य शासनाच्या न्यायिक सेवेतील, गट-अ ची पदे.

(२) नियुक्तीचे ठिकाण:- न्यायिक सेवेमध्ये महाराष्ट्रात कोठेही नियुक्ती होईल.

(३) वेतनबँड:- (१) **वेतनमॅट्रीक्स मधील स्तर जे-१** रुपये :- **७७८४०/-** अधिक नियमानुसार देय इतर भत्ते

(२) वेतनश्रेणीमध्ये शासनाच्या धोरणानुसार बदल होण्याची शक्यता आहे.

(४) उच्च पदावर बढतीची संधी:- ज्येष्ठता व पात्रतेनुसार महाराष्ट्र न्यायिक सेवेतील वरिष्ठ पदांवर.

१.३ भरावयाच्या पदांचा तपशील जाहिरात/अधिसूचनेद्वारे प्रसिद्ध करण्यात येईल. सदर पदसंख्या शासनाने कळविल्यानुसार राहील.

१.४ संपूर्ण भरती प्रक्रिया महाराष्ट्र न्यायिक सेवा नियम, २००८ व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या/येणाऱ्या सुधारणांसह, महाराष्ट्र न्यायिक सेवा (सुधारणा) नियम, २०२५, दिनांक ०१ डिसेंबर, २०२५ आणि मा. उच्च न्यायालय किंवा माननीय मुख्य न्यायमूर्ती यांनी वेळोवेळी जारी केलेल्या निर्देशांनुसार तसेच आयोगाच्या कार्यपनियमावलीनुसार राबविण्यात येईल. मात्र, आयोगाची कार्यनियमावली ही महाराष्ट्र न्यायिक सेवा नियम २००८ किंवा मा. उच्च न्यायालय किंवा मा. मुख्य न्यायमूर्ती यांनी दिलेल्या निर्देशाशी विसंगत ठरत असल्यास, त्यावेळी महाराष्ट्र न्यायिक सेवा नियम २००८ व निर्देश हे प्रमाण समजण्यात येईल.

२. परीक्षेचे टप्पे:- प्रस्तुत परीक्षा एकूण तीन टप्प्यांमध्ये घेण्यात येते:-

(एक) पूर्व परीक्षा	मुख्य परीक्षा	
	(दोन) लेखी परीक्षा	**(तीन)** मुलाखत
१०० गुण	२०० गुण	५० गुण

३. पात्रता :-

३.१ भारतीय नागरिकत्व

३.२ वयोमर्यादा व शैक्षणिक अर्हता :-

३.२.१ उमेदवारांनी त्यांच्या पात्र प्रवर्गानुसार खालीलप्रमाणे संबंधित अर्हता धारण करणे आवश्यक राहील:-

अ. क्र.	पात्र प्रवर्ग	जाहिरातीमध्ये विहित दिनांकास वय			शैक्षणिक अर्हता	जाहिरातीमध्ये विहित दिनांकास अनुभव
		किमान	कमाल			
		अमागास/आदुघ/ अनाथ/मागासवर्गीय/ दिव्यांग	अमागास/ आदुघ / अनाथ	मागास-वर्गीय/ दिव्यांग		
१	Advocate/ Public Prosecutor/ Government Advocate	21	35	40	Degree in Law	(i) Must have practiced as an Advocate in the High Court of Bombay or Courts subordinate thereto for not less than 3 years on **(date mentioned in the advertisement)** and while computing the period for practicing as an Advocate, the period during which the candidate has worked as a Law Clerk (after provisional enrolment or registration as an Advocate) with any of the Judges of the High Court of Bombay or Judicial Officers of the Courts subordinate to the High Court of Bombay shall be included. (ii) Practice as an Advocate shall be reckoned from the date of provisional enrollment or registration as an Advocate with the State Bar Council; or (iii) Must be working or must have worked as Public Prosecutor or Government Advocate for not less than three years in the post or posts as on **(date mentioned in the advertisement).** In computing the period of three years, the period during which the candidate has worked as an Advocate shall also be included."
OR						
२	Ministerial Staff - (i) of High Court of Bombay or Courts subordinate thereto	21	45	50	Degree in Law	Minimum three years of service as on **(date mentioned in the advertisement)** after obtaining Degree in Law.

	(ii) of Offices of the Government Pleaders attached to those Courts; (iii) working as Legal Assistant and above in the Legal Section of Law and Judiciary Department in Mantralaya, provided such employee					

३.२.२ वय, शैक्षणिक अर्हता व अनुभव यांची गणना जाहिरात/अधिसूचनेमध्ये नमूद दिनांकास करण्यात येईल.

३.२.३ जाहिरातीस अनुसरून निश्चित केलेल्या दिनांकापर्यंत संपादन केलेली अर्हता तसेच अनुभव सदर पदासाठी पात्रता व पुढील निवडीसाठी विचारात घेण्यात येईल.

३.२.४ सांविधिक विद्यापीठाकडून संबंधित परीक्षेचा निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकास शैक्षणिक अर्हता संपादन केली आहे, असे समजण्यात येईल.

३.३ मराठी भाषेचे ज्ञान:-

३.३.१ उमेदवारांनी वरील अर्हतेसह खाली नमूद अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे:-

(१) मराठी भाषा उत्तम रितीने बोलता, वाचता, लिहिता येणे.

(२) मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असल्याबाबतचे प्रमाणपत्र उमेदवाराजवळ असणे.

(३) मराठीतून इंग्रजीत व इंग्रजीतून मराठीत सफाईदारपणे भाषांतर करता येणे.

३.३.२ मराठी भाषेच्या ज्ञानाबद्दलचे प्रमाणपत्र खालील प्राधिकाऱ्यांकडून प्राप्त करणे आवश्यक आहे:-

(१) वकील (Advocate) किंवा अधिवक्ता(Attorny) - मा. उच्च न्यायालयाचे प्रबंधक (न्यायिक) किंवा उमेदवार ज्या ठिकाणी वकिली व्यवसाय करीत असेल किंवा ज्या अधिकारक्षेत्रात तो/ती सामान्यतः वास्तव्यास आहे, त्या ठिकाणच्या संबंधित जिल्ह्याचे प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश यांच्याकडून प्रमाणित केलेले.

(२) सेवा कर्मचारी - संबंधित उमेदवार ज्या कार्यालयात कार्यरत आहे त्या कार्यालयाच्या विभाग प्रमुख/ कार्यालयाच्या प्रमुखांकडून.

३.३.३ मराठी भाषेविषयीची अर्हता धारण न करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत शासन नियमानुसार **नियुक्तीपासून दोन वर्षाच्या** आत मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

३.४ अनुभवाचा पुरावा :-

३.४.१ अनुभवाबाबत खालील सक्षम प्राधिकाऱ्याने विहित नमुन्यात प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे :-

(१) अनुभवाच्या पुराव्या पृष्ठयर्थ संबंधित जिल्ह्याचे प्रधान जिल्हा न्यायाधीश किंवा उमेदवार ज्या ठिकाणी प्रॅक्टिस करीत आहे किंवा केली आहे त्या ठिकाणचे प्रधान न्यायिक अधिकारी यांच्याकडून प्रमाणित केलेले असावे; किंवा मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे वकिली व्यवसाय करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत किमान दहा वर्षांचा अनुभव असलेल्या वकिलाकडून, प्रबंधक (न्यायिक) / विशेष कार्य अधिकारी यांच्या अनुमोदनासह (endorsement) प्रमाणित केलेले असावे.

(२) सेवा कर्मचाऱ्यांबाबत –ज्यांच्या नियंत्रणाखाली सेवा आहे, असा विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख.

(३) विधी लिपिकाच्या (Law Clerk)बाबतीत - संबंधित न्यायालयाचे **प्रबंधक (Registrar)** यांच्याकडून.

३.४.२ शैक्षणिक अर्हता व अनुभवाचा कालावधी गणना करण्याचा दिनांक :-

(१) State Bar Council मध्ये वकील म्हणून तात्पुरती नोंदणी **(Provisional enrolment)** किंवा नोंदणीच्या **(Registration)** तारखेपासून वकिलीचा व्यवसाय गणला जाईल.

(२) जाहिरातीच्या दिनांकास म्हणजे, जाहिरात प्रसिद्ध केल्याच्या दिनांकास संपादन केलेली शैक्षणिक व इतर अर्हता तसेच अनुभव पात्रता विचारात घेण्यात येईल.

३.५ मा. उच्च न्यायालयाकडून दिनांक १९ डिसेंबर, २०१९ व दिनांक १३ मार्च, २०२६ रोजीच्या पत्राद्वारे प्राप्त अभिप्रायानुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील उमेदवारांना मागासवर्गीय उमेदवारांकरीता अनुज्ञेय असलेले कोणतेही फायदे/सवलती देय नाहीत.

३.६ लेखी परीक्षेच्या कालावधीत नक्कल किंवा गैरवर्तणूक केलेल्या किंवा फौजदारी केसेसमध्ये शिक्षा झालेल्या किंवा न्यायिक सेवेतून सक्तीने सेवानिवृत्त केलेल्या /काढून टाकलेल्या किंवा बडतर्फ केलेल्या किंवा कोणत्याही पदाचा प्रशिक्षण कालावधी यशस्वीरित्या पूर्ण न करणारा अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव नियुक्तीसाठी अपात्र ठरविलेला उमेदवार प्रस्तुत स्पर्धा परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरविला जाणार नाही.

४. शुल्क (फी):-

४.१ प्रस्तुत परीक्षेकरिता आयोगाकडून आकारण्यात येणारे शुल्क खालीलप्रमाणे आहे:-

अ.क्र.	परीक्षेचे नांव	परीक्षा शुल्क	
		अमागास	मागासवर्गीय
(१)	पूर्व परीक्षा	₹ ३९४/-	₹ २९४/-
(२)	मुख्य परीक्षा	₹ ५४४/-	₹ ३४४/-

४.२ विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), विशेष मागास प्रवर्ग, भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) इतर मागास वर्गातील तसेच सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या दुर्बल घटकातील उन्नत व प्रगत गटात (क्रिमी लेयर) मोडणाऱ्या उमेदवारांना आरक्षणाचा व वयोमर्यादेचा फायदा देय नसल्याने त्यांनी अमागास उमेदवारांप्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

४.३ उन्नत व प्रगत गटासंदर्भातील (क्रिमी लेयर) उत्पन्नाची मर्यादा तसेच अन्य तद्अनुषंगिक बाबी शासनाने वेळोवेळी जारी केलेल्या आदेशानुसार राहतील.

५. पूर्व परीक्षा: -

५.१ परीक्षा योजना:-

५.१.१ प्रश्नपत्रिका:- एक. प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

विषय व संकेतांक	दर्जा	माध्यम	प्रश्नांची संख्या	एकूण गुण	कालावधी	परीक्षेचे स्वरुप
विहित कायदेविषयक ज्ञान (**संकेतांक** ११३७)	पदाला साजेसा	इंग्रजी	१००	१००	दोन तास	वस्तुनिष्ठ बहुपर्यायी

५.१.२ पूर्व परीक्षेचा अभ्यासक्रम:-

(1) Code of Criminal Procedure
(2) Civil Procedure Code
(3) Evidence Act
(4) Transfer of Property Act
(5) Specific Relief Act
(6) Maharashtra Rent Control Act
(7) Limitation Act
(8) Constitution of India
(9) Indian Penal Code
(10) Law of Contract, The Sale of Goods Act and The Partnership Act.
(11) Bhartiya Nyaya Sanhita, 2023
(12) Bhartiya Sakshya Adhiniyam, 2023,
(13) Bhartiya Nagrik Surksha Sanhita, 2023 (BNSS)

५.२. परीक्षा केंद्र:-

५.२.१ दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग, पूर्व व मुख्य परीक्षा खालील ठिकाणी घेण्यात येते:-

केंद्र	केंद्राचा संकेतांक
छत्रपती संभाजीनगर	**१५**
कोल्हापूर	**२६**

केंद्र	केंद्राचा संकेतांक
नवी मुंबई	**३५**
नागपूर	**३१**

५.२.२ वरीलपैकी कोणतेही एक जिल्हा केंद्र ऑनलाईन पद्धतीने पूर्व आणि मुख्य परीक्षेकरीता अर्ज सादर करताना निवडणे आवश्यक आहे.

५.२.३ उपरोक्त जिल्हा केंद्रांमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ अथवा बदल होऊ शकतात.

५.२.४ उमेदवाराने निवडलेले जिल्हाकेंद्र व उपलब्धतेनुसार जिल्हा केंद्रावरील विविध परीक्षा उपकेंद्रावर पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

५.२.५ एखादे जिल्हा केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही अथवा एखाद्या जिल्हा केंद्रांवर उमेदवारांना प्रवेश देण्याची क्षमता ओलांडली गेली तर ते जिल्हाकेंद्र निवडलेल्या उमेदवारांची बैठक व्यवस्था जवळच्या दुसऱ्या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल.

५.२.६ एकदा निवडलेल्या जिल्हा केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या परीक्षा उपकेद्रांमध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

५.२.७ वरीलप्रमाणे जिल्हा केंद्रनिवडीची प्रक्रिया पूर्ण न केल्यास उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या स्थायी/कायमस्वरुपी रहिवासाच्या पत्त्याच्या आधारे नजिकच्या जिल्हाकेंद्रावर प्रवेश देण्यात येईल. याबाबत आयोगाचे त्या त्या वेळचे धोरण व आयोगाचा निर्णय अंतिम मानण्यात येईल.

५.२.८ आयोगाने उमेदवारास ज्या जिल्हाकेंद्रावरील परीक्षा उपकेंद्रावर प्रवेश दिला असेल त्याच ठिकाणी उमेदवारास उपस्थित राहणे अनिवार्य असेल.

५.३ पूर्व परीक्षेचा निकाल:-

५.३.१ उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन :-

(एक) वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना, उत्तरपत्रिकेत नमूद केलेल्या योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच, प्रत्येक चुकीच्या उत्तरामागे २५% किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

(**दोन**) एखाद्या प्रश्नाची एकापेक्षा अधिक उत्तरे दिली असल्यास अशा प्रश्नाचे उत्तर चुकीचे समजण्यात येऊन त्या प्रश्नाच्या उत्तराकरीता २५ % किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

(तीन) एखादा प्रश्न अनुत्तरित असेल तर अशा प्रकरणी नकारात्मक गुणांची पध्दत लागू असणार नाही.

(चार) वरीलप्रमाणे कार्यपद्धतीचा अवलंब करताना एकूण अंतिम गुणांची बेरीज अपूर्णांकात आली तरीही ती अपूर्णांकातच गणण्यात येईल व पुढील कार्यवाही त्याच्या आधारे करण्यात येईल.

५.३.२ उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यासाठी आयोगामार्फत वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची पूर्व परीक्षा घेण्यात येईल. प्रस्तुत पूर्व परीक्षेचा निकाल संगणकाद्वारे आधारित पद्धतीने तयार करण्यात येईल. पूर्व परीक्षेच्या निकालाद्वारे आयोगाने निश्चित केलेल्या सीमांकन रेषेप्रमाणे मुख्य परीक्षेस प्रवेशासाठीचे विज्ञापित पदांच्या १:१० गुणोत्तर राखण्यासाठी अशा सर्व उमेदवारांना मुख्य लेखी परीक्षेस प्रवेश देण्यात येईल.

५.३.३ आयोगाने निश्चित केलेल्या गुणांच्या सीमांकन रेषेइतकेच गुण एकापेक्षा अधिक उमेदवारांनी मिळविले असल्यास, अशा सर्व उमेदवारांना मुख्य परीक्षेस प्रवेश देण्यात येईल.

५.३.४ मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पर्याप्त उमेदवारांची संख्या ठरविण्याकरीता आयोगाकडून पूर्व परीक्षेसाठी निश्चित करण्यात आलेल्या किमान सीमारेषा (cut off line) किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या उमेदवारांना त्यांनी पूर्व परीक्षेच्या अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे ते विहित अटीची पूर्तता करतात, असे समजून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मुख्य परीक्षेच्या प्रवेशाकरीता पात्र समजण्यात येईल.

स्पष्टीकरण :- एखादा उमेदवार दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग सवंर्गासाठी सुरू असलेल्या कोणत्याही मागील निवड प्रक्रियेत, मुख्य परीक्षा किंवा मुलाखत अथवा निवड यादीत समाविष्ट असेल आणि तोच उमेदवार चालू भरतीप्रक्रियेमध्येही पात्र ठरत असेल, तर चालू भरतीप्रक्रियेमध्ये मुख्य परीक्षेस पात्र उमेदवारांची संख्या, अशा सामाईक (common) उमेदवारांच्या संख्येइतकी वाढविण्यात येईल.

५.३.५ पूर्व परीक्षा ही मुख्य परीक्षेच्या प्रवेशाकरिता उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने घेण्यात येणारी चाळणी परीक्षा असल्याने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र न ठरलेल्या उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांची फेरतपासणी केली जात नाही अथवा यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या अभिवेदनावर कार्यवाही केली जात नाही.

५.३.६पूर्व परीक्षेच्या अर्हतामानाच्या आधारे (cut off line) मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

५.३.७पूर्व परीक्षा ही चाळणी परीक्षा असल्याने, पूर्व परीक्षेचे गुण अंतिम निवडीसाठी विचारात घेतले जाणार नाहीत.

५.३.८ मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निकाल जाहीर झाल्याची बातमी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. तसेच, प्रत्येक उमेदवाराला मोबाईल क्रमांकावर लघुसंदेशद्वारे (एस.एम.एस.) द्वारे वैयक्तिकरित्या कळविण्यात येईल.

५.३.९ लघुसंदेशाद्वारे माहिती कळविण्याची सुविधा ही नेहमीच्या पध्दतीशिवाय अतिरिक्त सुविधा आहे. त्यामुळे पूर्व परीक्षेचा निकाल अथवा मुख्य परीक्षेच्या प्रवेशासंदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत उमेदवाराने विहित कालावधीत स्वत: खातरजमा करणे आवश्यक आहे.

६. मुख्य परीक्षा:-

६.१ परीक्षेचे टप्पे:- दोन. लेखी परीक्षा व मुलाखत

६.२ मुख्य परीक्षेस प्रवेश:-

६.२.१ पूर्व परीक्षेच्या सीमा रेषेच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या तसेच जाहिरात/अधिसूचनेतील तरतुदीनुसार आवश्यक शैक्षणिक अर्हता व अन्य अटींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारास मुख्य परीक्षेकरिता प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

६.२.२ आयोगाच्या कार्यालयाकडून अधिसूचना प्रसिध्द झाल्यानंतर आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळाद्वारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना त्यांच्या प्रोफाईलद्वारे अर्ज करता येईल. त्यावेळी मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी आयोगाने विहित केलेल्या ऑनलाईन पद्धतीने परीक्षा केंद्र निवडून परीक्षा-शुल्क विहित मुदतीत सादर करणे आवश्यक राहील.त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

६.२.३ मुख्य परीक्षेचा अर्ज सादर करताना उमेदवाराला परीक्षेचे माध्यम निवडावे लागेल. तसेच एकदा निवडलेले माध्यम कोणत्याही परिस्थितीत बदलण्यास परवानगी दिली जाणार नाही.

६.३ परीक्षा योजना:-

६.३.१ एकूण गुण:- (१) लेखी परीक्षा:- २०० गुण **(२) मुलाखत:-** ५० गुण

६.३.२ प्रश्नपत्रिकांची संख्या:- दोन अनिवार्य. प्रत्येक प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे:-

पेपर क्रमांक	विषय	विषय संकेतांक	कालावधी	गुण	प्रश्नपत्रिकेचे स्वरूप	माध्यम	दर्जा
१	(1) Civil Procedure Code. (2) Transfer of Property Act. (3) Specific Relief Act. (4) Law of Contracts, Sale of Goods Act and Partnership Act.	११३८	तीन तास	१००	पारंपरिक/ वर्णनात्मक	मराठी / इंग्रजी	पदाला साजेसा
२	(1) Indian Penal Code. (2) Evidence Act. (3) Code of Criminal Procedure. (4) Scheduled Castes and Scheduled Tribes (Prevention of Atrocities) Act 1989 and Protection of Civil Rights Act 1955. (5) Essay on Current Legal topics (Approximately 800 words) (6) Bharatiya Nyaya Sanhita, 2023, (7) Bharatiya Sakshya Adhiniyam, 2023, (8) Bharatiya Nagarik Suraksha Sanhita 2023, (BNSS)	११३९	तीन तास	१००	पारंपरिक/ वर्णनात्मक	मराठी / इंग्रजी	पदाला साजेसा

६.३.३ आयोगाकडून परीक्षेच्या वेळी उत्तरे लिहिण्याकरीता पुरविण्यात येणाऱ्या पारंपरिक/वर्णनात्मक स्वरुपाच्या उत्तरपुस्तिकेमध्ये दिलेल्या पृष्ठांवरच उत्तरे नमूद करणे आवश्यक आहे.

६.३.४ मुख्य उत्तरपुस्तिकेव्यतिरिक्त कोणत्याही परिस्थितीत पुरवणी/अतिरिक्त उत्तरपुस्तिकेचा पुरवठा करण्यात येणार नाही.

६.३.५ पारंपरिक/वर्णनात्मक स्वरुपाच्या उत्तरपत्रिकेमध्ये उमेदवाराने प्रश्नांचे उपप्रश्न सोडविताना (अ,ब,क,ड किंवा १,२,३,४) सलगरित्या सोडवावे.

६.३.६ प्रश्नाचा एक भाग एका पानावर, तर दुसरा भाग काही पृष्ठे सोडून अथवा काही अन्य पृष्ठावर उपप्रश्न सोडविल्यास तो उपप्रश्न दुर्लक्षित करण्यात येईल.

७. मुख्य/लेखी परीक्षेचा निकाल:-

७.१ यशस्वी उमेदवारांना उपलब्ध रिक्त पदांच्या १:३ या गुणोत्तर प्रमाणात मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. तसेच १:३ हे गुणोत्तर प्रमाण ठेवण्यासाठी आयोगाने निश्चित केलेल्या गुणांच्या सीमांकन रेषेएवढे (Cut-off) गुण मिळविलेले एकापेक्षा अधिक उमेदवार असतील तर, अशा सर्व उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल.

७.२ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग संवर्गाच्या ५० गुणमर्यादा असलेल्या मुलाखतीस बोलविण्यासाठी पात्र होण्याकरीता उमेदवारास मुख्य परीक्षेमध्ये प्रत्येक प्रश्नपत्रिकेमध्ये किमान ५० गुण मिळविणे आवश्यक राहील .

७.३ मागास प्रवर्गातील अथवा दिव्यांग उमेदवारांनी वरीलप्रमाणे मुलाखतीस पात्र होण्यासाठी किमान 45 टक्के गुण मिळविणे आवश्यक आहे.

७.४ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग सवंर्गासाठी सुरू असलेल्या कोणत्याही मागील निवड प्रक्रियेत, मुख्य परीक्षा किंवा मुलाखत अथवा निवड यादीत समाविष्ट असेलेले आणि तेच उमेदवार चालू भरतीप्रक्रियेमध्येही पात्र ठरत असतील, तर चालू भरतीप्रक्रियेमध्ये मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची संख्या, अशा सामाईक (common) उमेदवारांच्या संख्येइतकी वाढविण्यात येईल.

८. गुणपडताळणी :-

८.१ पूर्व परीक्षेकरिता गुणांची पडताळणी अथवा फेरतपासणी करण्याबाबतची निवेदने कोणत्याही परिस्थितीत विचारात घेण्यात येणार नाहीत. अशी निवेदने प्राप्त झाल्यास ती दप्तर दाखल करण्यात येतील, त्यांना कोणतीही उत्तरे देण्यात येणार नाहीत.

८.२ पारंपरिक स्वरूपाच्या परीक्षा/उत्तरपुस्तिकेकरिता फक्त गुणांची पडताळणी करण्यात येते. फेरमुल्यांकन (Revaluation) केले जात नाही.

८.३ आयोगाकडून कोणत्याही परीक्षांच्या उत्तरपुस्तिकांचे फेरमुल्यांकन (Revaluation) केले जात नाही. फेरमुल्यांकनाबाबतची सर्व अभिवेदने कोणतीही कार्यवाही न करता परस्पर दप्तरदाखल करण्यात येतील व या संदर्भात उमेदवारांना काहीही कळविले जाणार नाही.

८.४ निकाल जाहीर झाल्यानंतर प्रोफाईलमध्ये गुणपत्रक प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून प्रसिद्धीपत्रकात विहित केलेल्या कालावधीत उमेदवाराने गुणांची पडताळणी करण्याकरिता अर्ज केल्यास त्याचा विचार केला जाईल. त्याकरिता विहित पद्धतीने अर्ज करणे तसेच प्रत्येक विषयाला आयोगाकडून निश्चित करण्यात आलेल्या दराप्रमाणे शुल्क भरणे आवश्यक आहे.

९. मुलाखत :-

९.१ मुलाखत ५० गुणांची असेल.

९.२ मुलाखतीमध्ये किमान ४० टक्के गुण मिळविणाऱ्या उमेदवारांचाच अंतिम निवड/शिफारशीकरीता विचार केला जाईल.

९.३ दिव्यांग व्यक्तिंच्याबाबतीत ३५% अथवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांचाच फक्त अंतिम निवडीसाठी विचार केला जाईल

९.४ उमेदवाराची मानसिक दक्षता, कायद्याचे ज्ञान, स्पष्ट व तर्कशुध्द निर्णयक्षमता, न्यायनिर्णयांचा समतोलपणा, कौशल्य, दृष्टीकोन, नीतीतत्वे, आकलन शक्ती, संवाद क्षमता, चारित्र्य, बौद्धिक सखोलता आणि उमेदवाराची आवड यांचे मुल्यमापन करुन या संवर्गासाठी योग्यता निश्चित करणे हा मुलाखतीचा हेतू आहे.

१०. प्रमाणपत्र पडताळणी:-

१०.१ मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची पात्रता जाहिरात/अधिसूचनेतील अर्हता/अटी व शर्तीनुसार मूळ कागदपत्राच्या आधारे तपासली जाईल आणि अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्र सादर करणाऱ्या उमेदवारांची मुलाखत घेतली जाईल.

१०.२ पात्रता/सवलतींसंदर्भात अर्जामध्ये निर्विवादपणे दावा केलेला असणे (Claimed) आवश्यक आहे. अर्जामध्ये केलेल्या प्रत्येक दाव्याच्या पुष्ट्यर्थ आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्याशिवाय पात्रता/सवलत देय होणार नाही अथवा उमेदवारी अंतिम समजण्यात येणार नाही.

१०.३ विहित कागदपत्रे सादर करू न शकणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल व त्याची मुलाखत घेतली जाणार नाही. तसेच त्याकरिता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

१०.४ लेखी मुख्य परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुलाखतीसाठी पात्र ठरणाऱ्या उमेदवारांच्या मुलाखती आयोगाच्या कार्यक्रमानुसार तसेच आयोगाने निश्चित केलेल्या ठिकाणी व विहित वेळेस घेण्यात येतील.

१०.५ पात्रतेसंदर्भातील अथवा विविध सवलती संदर्भातील विहित नमुन्यातील मूळ प्रमाणपत्रे मुलाखतीचेवेळी सादर न केल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल.

११. भरती प्रक्रियेतून बाहेर पडणे(Opting out option) :-

११.१ अंतिम शिफारसीपूर्वी परीक्षानिहाय सर्वसाधारण गुणवत्ता यादी (General Merit List) तसेच तात्पुरती निवड यादी (Provisional Selection List) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

११.२ तात्पुरती निवड यादीच्या आधारे भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (Opting Out) पर्याय सादर करण्यासाठी संबंधित उमेदवारांना ७ दिवसांचा कालावधी देण्यात येईल.

११.३ भरतीप्रक्रियेमधून बाहेर पडण्याचा पर्याय सादर केलेल्या उमेदवारांचा विदा(Data) लक्षात घेऊन अंतिम शिफारस यादी (Final Recommendation List) तयार करण्यात येईल.

११.४ पदभरतीकरीता भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे याबाबतची कार्यवाही फक्त आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे विहित कालावधीमध्ये करणे अनिवार्य आहे. यासंदर्भातील इतर कोणत्याही पद्धतीने केलेल्या तसेच नंतरच्या टप्प्यावर पर्याय रद्द करण्यासंदर्भात केलेल्या विनंतीचा विचार केला जाणार नाही.

१२. अंतिम निकाल:-

१२.१ लेखी मुख्य परीक्षा व मुलाखतीमध्ये प्राप्त केलेल्या एकूण गुणांच्या आधारे उमेदवारांची अंतिम निवड करण्यात येईल.

१२.२ लेखी मुख्य परीक्षा आणि मुलाखतीमध्ये प्राप्त केलेल्या गुणांची एकत्रित बेरीज करुन गुणवत्ताक्रमानुसार यादी तयार करण्यात येईल.

१२.३ अशा प्रकारे तयार केलेली निवड यादी तयार केल्यापासून ०१ महिन्याच्या आत आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल, आणि ही यादी प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून एक वर्ष पूर्ण झाल्यावर किंवा चालू निवड प्रक्रियेकरीता त्याच पदासाठी अशा प्रकारची यादी प्रसिद्ध झाल्यावर, यापैकी जे नंतर घडेल तोपर्यंत कार्यान्वित राहील.

१२.४ गुणवत्ता यादीमधील समान गुण धारण करणाऱ्या उमेदवारांचा प्राधान्यक्रम (Ranking) आयोगाच्या दिनांक १२ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकामध्ये नमूद केलेल्या निकषानुसार किंवा कार्यनियमावलीतील तरतुदीनुसार ठरविण्यात येईल.

१३. शिफारस:-

१३.१ **"उमेदवारांना सर्वसाधारण सूचना"** मध्ये नमूद केलेल्या कार्यपद्धतीनुसार उमेदवारांच्या शिफारसी शासनाच्या संबंधित विभागाकडे पाठविण्यात येतील.

१३.२ मुलाखतीकरीता उपस्थित उमेदवारांना मुलाखतीनंतर त्यांची नियुक्तीसाठी शासनाकडे शिफारस करण्यात आली आहे किंवा नाही, ते प्रोफाईलद्वारे कळविण्यात येईल.

१३.३ शिफारसपात्र प्रत्येक उमेदवारास आयोगाकडील नोंदणीकृत क्रमांकावर लघुसंदेशाद्वारे कळविण्यात येईल. तसेच, शिफारस झालेल्या उमेदवारांची नावे आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील

१४. प्रतीक्षा यादी :-

१४.१ प्रस्तुत संवर्गाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार विज्ञापित पदसंख्येच्या १०% एवढ्या पदांकरीता प्रतिक्षा यादी ठेवण्यात येईल. सदर पदसंख्येमध्ये बदल होऊ शकतो.

१४.२ प्रस्तुत संवर्गाची प्रतिक्षा यादी तयार केल्यापासून १ महिन्याच्या आत आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल, आणि ही यादी प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून एक वर्ष पूर्ण झाल्यावर किंवा चालू निवड प्रक्रियेकरीता त्याच पदासाठी अशा प्रकारची यादी प्रसिद्ध झाल्यावर, यापैकी जे नंतर घडेल तोपर्यंत कार्यान्वित राहील.

१५. खालीलपैकी कोणतीही व्यक्ती नियुक्तीसाठी पात्र ठरणार नाही:-

१५.१ न्यायिक सेवेतून किंवा शासनाच्या किंवा सांविधिक किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या सेवेतून सक्तीने निवृत्त करण्यात आले असेल, काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल किंवा न्यायिक सेवेतील किंवा शासनाच्या किंवा सांविधिक अथवा स्थानिक प्राधिकरणाच्या सेवेतील कोणत्याही पदाचा परिविक्षा कालावधी पूर्ण केला नसेल **किंवा**

१५.२ नैतिक अधोगतीचा समावेश असणाऱ्या गुन्हयांच्या अपराधासाठी सिध्दपराधी ठरविण्यात आले असेल किंवा उच्च न्यायालय किंवा संघ लोकसेवा आयोग किंवा कोणत्याही राज्य लोकसेवा आयोगाने घेतलेल्या परीक्षेस बसण्यापासून कायमचे प्रतिरोधित केले असेल किंवा अपात्र ठरविले असेल अथवा ठरविण्यात आले असेल **किंवा**

१५.३ उमेदवारीकरिता सेवाभरती प्राधिकरणावर कोणत्याही मार्गाने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या प्रभाव टाकला असेल **किंवा**

१५.४ उमेदवार पुरुष असेल व त्याला एकापेक्षा जास्त हयात पत्नी असतील आणि उमेदवार स्त्री असेल तर हयात पत्नी असलेल्या पुरुषाशी स्त्रीने विवाह केला असेल **किंवा**

१५.५ ज्या दांपत्याला फक्त एकच अपत्य आहे, आणि त्यानंतरच्या एकाच प्रसूतीतून जन्मास येणारी कितीही अपत्ये असली, तरी ती एकच अपत्य समजली जातील. परंतु महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ या नियमांच्या दिनांकापासून म्हणजेच दिनांक २८ एप्रिल, २००५ रोजी ज्या व्यक्तिस दोनपेक्षा अधिक अपत्ये होती, आणि जोपर्यंत नियमांच्या प्रारंभाच्या दिनांकास असलेल्या अपत्यांच्या संख्येत पुढे कोणतीही वाढ झालेली नाही तोपर्यंत ती व्यक्ती या कलमान्वये नियुक्तीस अपात्र ठरणार नाही. पुढे असेही नमूद करण्यात येते की, तसेच सदर नियम अंमलात येण्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीत एका प्रसूतीमध्ये जन्मास आलेले एक किंवा एकपेक्षा अधिक अपत्य या कलमान्वये नमूद केलेल्या अनर्हतेच्या प्रत्यायोजनासाठी विचारात घेण्यात येणार नाही.

१६. सेवाप्रवेशोत्तर शर्ती:-

१६.१ नियुक्त झालेल्या व्यक्तीस खालील परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील:-

१६.१.१ जेथे प्रचलित नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा विहित केली असेल अथवा आवश्यक असेल तेथे त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा

१६.१.२ हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा

१६.१.३ महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणीबाबतची प्रमाणपत्र परीक्षा

१६.२ नियुक्तीसाठी शिफारस झालेल्या उमेदवारांना नियुक्तीच्यावेळी सदर पदावर तीन वर्षे कार्यरत राहणार आहे, याबाबतचे ₹ २,००,०००/- (रुपये दोन लाख) एवढया रकमेचे बंधपत्र लिहून देणे आवश्यक राहील.

१६.३ नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तीला त्या कोणत्याही न्यायालयात किंवा त्या न्यायालयास दुय्यम असलेल्या न्यायालयात सेवेत असताना त्याची/तिची सेवा समाप्ती झाल्यापासून दोन वर्षापर्यंत वकिली व्यवसाय करण्यास प्रतिरोध करण्यात येईल आणि सेवा समाप्त झाल्यापासून अशा न्यायालयांमध्ये दोन वर्षासाठी वकिली व्यवसाय करणार नाही, असे लेखी हमीपत्र देणे आवश्यक आहे.

१६.४. प्रस्तुत पदावरील नियुक्ती तीन वर्षाच्या कालावधीसाठी परिविक्षाधीन असेल.

१७. उत्तरपत्रिकेची प्रत व इतर तपशील :-

१७.१ वस्तुनिष्ठ बहुपर्यायी पद्धतीच्या पेपरची उत्तरपत्रिका संबंधित परीक्षेच्या निकालानंतर आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे संबंधित उमेदवाराच्या प्रोफाईलद्वारे खालील तपशीलासह उपलब्ध करून देण्यात येईल :-

(१) मूळ उत्तरपत्रिकेची स्कॅन इमेज

(२) निकालाकरीता गृहित धरलेले गुण

(३) गुणांची किमान सीमांकन रेषा.

१७.२ पारंपरिक/वर्णनात्मक पध्दतीच्या पेपरची उत्तरपुस्तिका उमेदवारांना प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.

१८. प्रस्तुत परीक्षा योजना उमेदवारांना परीक्षेचे स्वरुप समजण्यास सुलभता व्हावी, या हेतूने प्रसिध्द करण्यात येत असून यामधील कोणतीही तरतूद प्रस्तुत परीक्षेची जाहिरात / अधिसूचना, संबंधित शासन निर्णय व आयोगाच्या कार्यनियमावली यांमधील तरतूदींशी विसंगत

असल्यास प्रस्तुत परीक्षेची जाहिरात / अधिसूचना, संबंधित शासन निर्णय व आयोगाच्या कार्यनियमावलीतील तरतुदी ग्राह्य धरण्यात येतील.

सं. पां. देशमुख
उप सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

ठिकाण: नवी मुंबई
दिनांक: ३० एप्रिल, २०२६